आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
३० जुलै २०२५ - बुधवार

**ठळक बातम्या**

- ऑपरेशन सिंदूरवर राज्यसभेत चर्चेला प्रारंभ

- इस्रो आणि नासा चा संयुक्त उपक्रम, ‘निसार’ या उपग्रहाचं आज संध्याकाळी प्रक्षेपण

- जम्मू काश्मीरमधे सुरक्षा दलाच्या कारवाईत दोन दहशतवादी ठार.

- मकाऊ खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताची  दमदार सुरुवात

- रशियाच्या  कामाचाटका किनारपट्टीजवळ पॅसिफिक महासागरात आज पहाटे ८ पूर्णांक ८ दशांश रिक्टर स्केल क्षमतेचा भूकंप

**आणि**

- विख्यात अर्थतज्ज्ञ आणि यूकेच्या हाऊस ऑफ लॉर्ड्सचे सदस्य मेघनाद देसाई यांचं निधन

**<><><><><>**

राज्यसभेत ऑपरेशन सिंदूरवर आजही चर्चा सुरु राहिली. या चर्चेत परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ. एस जयशंकर यांनी सांगितलं की, पहलगाम इथं दहशतवादी हल्ल्यात निरपराध नागरिकांचा मृत्यू झाला. त्यावर केंद्रसरकारने पाकिस्तानविरोधात कठोर धोरण घेतलं आहे. दहशतवादाला पाठबळ देणाऱ्या पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी सिंधू पाणीवाटप कराराला स्थगिती देण्यात आली. आणि पाकिस्तानातले दहशतवादी स्थळ उद्ध्वस्त करण्यासाठी ऑपरेशन सिंदूर राबवण्यात आलं. १९४७ नंतर सातत्याने पाकिस्तान भारत विरोधी दहशतवादी कारवायांना पाठबळ देत आहे. याआधीच्या सरकारने मात्र

पाकिस्तानशी केवळ चर्चा केली. आता सरकारनं उचललेली कठोर पावलं जगानं पाहिली आहेत, असं ते म्हणाले. त्यापूर्वी विविध मुद्यांवरुन विरोधकांनी गदारोळ केल्यामुळे आज राज्यसभेच्या कामकाजात व्यत्यय येत राहिला. उपाध्यक्ष हरिवंश यांनी ११ वाजता शून्य प्रहर पुकारण्याचा प्रयत्न केला. मात्र घोषणाबाजीमुळे तो चालवता आला नाही. बिहारमधलं मतदार याद्यांचं सखोल पुनरिक्षण आणि इतर मुद्यांवर मिळून १८ स्थगन प्रस्ताव आपल्याकडे आले आहेत, असं सांगून ते फेटाळले असल्याचं उपाध्यक्षांनी सांगितलं.

<><><><><>

वंदे भारत रेल्वे सुविधा अल्पावधीतच देशातल्या सर्व राज्यांमधे पोहोचल्याची माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज लोकसभेत एका प्रश्नाच्या उत्तरात दिली. देशभरात सध्या १४४ वंदे भारत गाड्या रेल्वेमार्गांवरुन धावत आहेत, असं ते म्हणाले. या गाड्यांना मिळणारा प्रतिसाद चांगला असून, त्यांना वाढती मागणी आहे, असं त्यांनी सांगितलं. २०१४-१५ च्या तुलनेत रेल्वे अपघातांमध्ये ७७ टक्के घट झाल्याचं  वैष्णव यांनी दुसऱ्या एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं ते म्हणाले की, २०१४-१५ मध्ये रेल्वे अपघातांची संख्या १३५ होती. २०२४-२५ मध्ये ती ३१ वर आली. सरकारने ‘कवच’ सारखी  देशांतर्गत विकसित स्वयंचलित संरक्षण प्रणाली  सादर करून प्रवासी आणि रेल्वे सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

‘संचार साथी’ उपक्रमाच्या मदतीने १ कोटी ३६ लाखापेक्षा जास्त मोबाईल जोडण्या रद्द करण्यात आल्याचं दूरसंचार मंत्री जोतिरादित्य शिंदे यांनी म्हटलं आहे. ते आज लोकसभेत पुरवणी प्रश्नांना उत्तर देत होते. या पोर्टलवर ३५ लाखांपेक्षा जास्त मोबाईल चोरीच्या तक्रारी दाखल झाल्या असून, त्यापैकी २१ लाखापेक्षा जास्त मोबाईल शोधण्यात आले, तर ५ लाखापेक्षा जास्त मोबाईल

त्याच्या मालकाला परत करण्यात आले, अशी माहिती त्यांनी दिली. सायबर गुन्हे आणि आर्थिक फसवणूक रोखण्यासाठी दूरसंचार यंत्रणेच्या  गैरवापराशी संबंधित माहिती भागधारकांना देण्यासाठी डिजिटल इंटेलिजेंस प्लॅटफॉर्म सुरू करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

**<><><><>**

इस्त्रो, अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्था आणि अमेरिकेच्या नासा यांचा संयुक्त उपक्रम असलेला नासा - इस्त्रो सिंथेटिक अपर्चर रडार म्हणजे, ‘निसार’ या उपग्रहाचं आज संध्याकाळी श्रीहरिकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रातून प्रक्षेपण होणार आहे. काल दुपारी दोन वाजल्यापासून  त्याची उलटगणती सुरु झाली. या उपग्रहाच्या माध्यमातून दर बारा दिवसांनी संपूर्ण पृथ्वीचं निरीक्षण करण्यात येणार असून, हवामान बदल, संशोधन आणि आपत्ती प्रतिसादासाठी उच्च प्रतीच्या प्रतिमा मिळणार आहेत. सेंटीमीटर पातळीवर अचूकतेसह पृथ्वीच्या पृष्ठभागावरच्या  बदलांचा मागोवा घेण्यासाठी यामध्ये नासाचा  एल - बँड आणि इस्त्रोचा  एस - बँड हे रडार आहेत.

**<><><><>**

डीआरडीओ, अर्थात संरक्षण, संशोधन आणि विकास संस्थेनं स्वदेशी बनावटीच्या 'प्रलय' क्षेपणास्त्राची काल यशस्वी चाचणी केली. भारताच्या संरक्षण शक्तीला अधिक बळकट करण्यासाठी बनवलेलं 'प्रलय' हे जमिनीवरून जमिनीवर मारा करणारं, लक्ष्यावर जलद आणि अचूकपणे मारा करण्यास सक्षम असलेलं, जलद प्रतिक्रिया देणारं बॅलिस्टिक क्षेपणास्त्र आहे.

**<><><><>**

युपीआयद्वारे व्यवहारांबाबातचे नवे दिशानिर्देश येत्या एक ऑगस्टपासून लागू होणार आहेत. आता युपीआयद्वारे रक्कम देताना प्राप्तकर्त्याच्या  बँकेचं नावंही वापरकर्त्याला  दिसणार आहे. त्यामुळे योग्य खात्यावर पैसे पाठवले जात आहेत

याची खात्री होईल. तसंच प्रत्येक व्यवहार झाल्यावर खात्यातली रक्कमही दिसेल. याशिवाय अनेक नवीन अटी लागू करण्याचा निर्णय नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशननं घेतला आहे. त्यानुसार प्रलंबित असलेल्या व्यवहारांची माहिती दिवसातून केवळ तीन वेळा पाहता येईल. याशिवाय युपीआय ॲपमधून दिवसाला जास्तीत जास्त ५० वेळा खात्यातली रक्कम तपासता येईल. युपीआयच्या माध्यमातून ऑटो पे चे व्यवहार यापुढे केवळ ठरावीक वेळांमध्येच होतील, असं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

**<><><><>**

जम्मू काश्मीर मध्ये पुछ सेक्टर मधे सुरक्षा दलाने आज केलेल्या कारवाईत दोन दहशतवादी ठार झाले. 'बाड' भागात नियंत्रण रेषेजवळ आज सकाळी संशयास्पद हालचाली आढळून आल्यावर सुरक्षा दलाने त्वरित कारवाई सुरू केली. या कारवाईत मोठ्या प्रमाणात शस्त्र साठा जप्त करण्यात आल्याचं सुरक्षा दलानं समाज माध्यमावर म्हटलं आहे.

जम्मू-काश्मीरमध्ये पोलिसांनी केलेल्या आणखी एका कारवाईत नागरोटा-टीसीपी नाका इथं दहशतवादी संघटनेशी संबंधित असल्याच्या आरोपावरून एका व्यक्तीला अटक केलं. या प्रकरणी पुढला तपास सुरु असल्याचं संबंधित सूत्रांनी सांगितलं.

**<><><><>**

मकाऊ खुल्या बॅडमिंटन स्पर्धेमध्ये भारताने विविध श्रेणींमध्ये उत्कृष्ट कामगिरीसह दमदार सुरुवात केली. पुरुष दुहेरीत सत्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टीने मलेशियाच्या लो हंग यी आणि एनग चियॉगवर सरळ सेटमध्ये मात करत दुसऱ्या फेरीत प्रवेश केला.महिला एकेरीमध्ये, अनमोल खरब आणि तस्नीम मीर यांनी त्यांच्या पात्रता फेरीमध्ये विजय मिळवून मुख्य ड्रॉमध्ये प्रवेश केला. अनमोलने अझरबैजानच्या तर तस्नीमने थायलंडच्या प्रतिस्पर्ध्यांचा पराभव

केला. पुरुष दुहेरीच्या पात्रता फेरीत, डिंकु सिंग कोंथुजाम आणि मान मोहम्मद यांनी हाँगकाँगच्या जोडीवर विजय मिळवून मुख्य ड्रॉमध्ये स्थान मिळवले. मिश्र दुहेरीमध्येही यश मिळवत भारताच्या थंडरंगिनी हेमा नागेन्द्र बाबू आणि प्रिया कोनजेंगबाम यांनी मुख्य फेरीत प्रवेश केला आहे.

**<><><><><>**

रशियाच्या कामाचाटका किनारपट्टीजवळ पॅसिफिक महासागरात आज पहाटे ८ पूर्णांक ८ दशांश रिक्टर स्केल क्षमतेचा भूकंपाचा धक्का बसला. गेल्या काही वर्षांमधला जगातला हा सर्वात शक्तिशाली भूकंप होता. भूकंपानंतर रशियाच्या सेवेरो-कुरिलस्क या बंदर शहराला तीन त्सुनामी धडकल्या. भूकंपामुळे बंदराच्या पायाभूत सुविधांचं नुकसान झालं असून, या भागातली अनेक जहाजं सामुद्रधुनीत बुडाल्याचं स्थानिक वृत्तसंस्थेनं म्हटलं आहे. भूकंपाचा केंद्रबिंदू किनारपट्टीपासून सुमारे १३६ किलोमीटर अंतरावर, समुद्रात १९ किलोमीटर खोल होता. भूकंपानंतर पॅसिफिक त्सुनामी वॉर्निंग सेंटरने, रशिया, जपान आणि पॅसिफिक महासागरातल्या बेट राष्ट्रांना त्सुनामीचा इशारा दिला आहे. रशियाच्या कामाचाटका द्वीपकल्पाच्या काही भागात ३ ते ४ मीटर उंचीच्या लाटा उसळल्याची नोंद झाली. जपानच्या उत्तर किनारपट्टी भागात ३० ते ४० सेंटीमीटर उंचीच्या त्सुनामी लाटा उसळल्या असून, आणखी मोठ्या लाटा उसळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. अमेरिकेत दक्षिण अलास्का आणि अल्युशियन बेटांच्या काही भागांसाठी त्सुनामीचा इशारा जारी केला आहे. हवाईमध्ये, स्थानिक प्रशासनानं होनोलुलू सह इतर भागातल्या रहिवाशांना तात्काळ सुरक्षित ठिकाणी हलवण्याचे आदेश दिले आहेत.

**<><><><><>**

विख्यात अर्थतज्ज्ञ आणि यूकेच्या हाऊस ऑफ लॉर्ड्सचे सदस्य मेघनाद देसाई यांचं काल निधन झालं. ते ८५ वर्षांचे होते. गुजरातच्या वडोदरा इथं

१९४०मध्ये त्यांचा जन्म झाला. मुंबई विद्यापीठातून पदव्युत्तर शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी पेन्सिल्वेनिया विद्यापीठातून पीएचडी पूर्ण केली. सहा दशकांच्या आपल्या प्रदीर्घ कारकीर्दीत त्यांनी ८ पुस्तकं आणि दोनशेपेक्षा जास्त संशोधनपर निबंधांचं लेखन केलं. अर्थशास्त्र, शिक्षणक्षेत्र आणि राजकीय विचारवंत म्हणून त्यांचं नाव जगभरात आदराने घेतलं जातं. देसाई यांच्या निधनाबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला. भारत आणि भारतीय संस्कृतीशी ते नेहमी जोडलेले राहिले, तसंच भारत आणि यूके यांच्यातले संबंध बळकट करण्यात त्यांनी योगदान दिलं, असं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये नमूद केलं.

**<><><><><>**

भारतीय हवामान विभागाने बिहार, पूर्व राजस्थान, हिमाचल प्रदेश आणि पश्चिम उत्तर प्रदेशात काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. तर महाराष्ट्रासह उर्वरीत देशातही मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दरम्यान, मच्छिमारांनी 3 ऑगस्टपर्यंत अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरात जाऊ नये असा सल्ला हवामान विभागाने दिला आहे.

**<><><><><>**

‘को- मे’ हे टायफून चक्रीवादळ आज सकाळी चीनच्या झेजियांग प्रांतात धडकलं. चक्रीवादळाच्या मध्यभागी वाऱ्याचा वेग २३ मीटर प्रति सेकंद इतका असून हे चक्रीवादळ १५ ते २० किलोमीटर प्रतितास इतक्या वेगानं वायव्येला सरकत आहे.

**//<><><><><>//**